वितरण आदेश क्रमांक: ९
कोषागारातून रोख रक्कम देय अनुदान
सन २०२५-२०२६

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रशासक कार्यरत असल्यामुळे ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी रोखून ठेवला होता त्यापैकी ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूका होऊन लोकनियुक्त प्रतिनिधींची नियुक्ती झाली आहे अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन २०२२-२३ चा पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा बंधित निधी रू. २२४.६५१४ कोटी वितरीत करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२५/प्र.क्र.९२/वित्त-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
दिनांक : २३ मार्च, २०२६

**वाचा :**

१. शासन परिपत्रक क्रमांकः पिईएस-२३२०/प्र.क्र.२२/ आसक, ग्राविवि.दि.२८/०४/२०२०
२. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि.दि.२६/०६/२०२०
३. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्रा.वि.वि.दि.०४/१२/२०२०
४. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२२/प्र.क्र. १७६ /वित्त-४, ग्रा.वि.वि.दि.१८/११/२०२२
५. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२२/प्र.क्र. १७६ /वित्त-४, ग्रा.वि.वि.दि.०६/०४/२०२३
६. वित्त मंत्रालय, भारत सरकार पत्र **क्रमांक F.8(4)/FCD/2025-26(RLB Release No.90/ 2025-26) दिनांक २०.०३.२०२६**

**प्रस्तावना :**

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रशासक कार्यरत असल्यामुळे ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी रोखून ठेवला होता त्यापैकी ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूका होऊन लोकनियुक्त प्रतिनिधींची नियुक्ती झाली आहे अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा सन २०२२-२३ च्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा बंधित निधी रू. २२४.६५१४ कोटी वितरीत केला असल्याचे वित्त

मंत्रालय, भारत सरकार यांच्या संदर्भ क्र.६ येथील आदेशान्वये कळविले आहे. त्यानुसार १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाकडून राज्य शासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

वित्त मंत्रालय, व्यय विभाग, वित्त आयोग यांच्या दि. १४.७.२०२१ च्या पत्रासोबतच्या मार्गदर्शक सूचना 5 (A) (ii) नुसार जर ग्रामीण स्थानिक संस्थांची रीतसर स्थापना केली असेल तर ग्रामीण स्थानिक संस्था अनुदान देण्यास पात्र असल्याचे मानले जाईल. तसेच राज्यांना अनुदान फक्त रीतसर स्थापना (Duly Constituted) केलेल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रो रेटा आधारावर दिले जाईल असे कळविले आहे.

२. सन २०२२-२३ मध्ये प्रशासक कार्यरत असलेल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधित निधीचा पहिला व दुसरा हप्ता वितरित करण्यात आलेला नाही. ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका होऊन लोकप्रतिनिधींची नियुक्ती झालेली आहे, अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रु. २२४.६५१४ कोटीची मागणी पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे करण्यात आली होती. संदर्भ क्रमांक ६ अन्वये राज्यास निधी वितरित करण्यात आलेला आहे. ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सदर निधीचे वितरण करण्यात येणार आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे

| ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थां | पहिला हप्ता | दुसरा हप्ता |
|---|---|---|
| जिल्हा परिषद | १२ | १२ |
| पंचायत समिती | १२५ | १२५ |
| ग्रामपंचायत | ५० | ३२४ |

३. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन २०२२-२३ चा बंधित निधीचा प्रशासक कार्यरत असल्यामुळे रोखून ठेवलेला पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा निधी रु.२२४.६५१४ कोटी वितरण सोबतच्या विवरणपत्रात (प्रपत्र- अ ) दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना (जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी) अनुक्रमे लेखाशीर्षाखाली (२५१५२६३७ / २५१५२६५५ / २५१५२६७३) वितरित करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांना निधी वितरीत करण्यासाठी विवरणपत्र (प्रपत्र - अ) नुसार निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे (बीम्सवर) वितरीत करण्यात येत आहे. तसेच जिल्हा परिषदांना ग्रामविकास

विभागामार्फत निधीचे वितरण (प्रपत्र- अ) नुसार केले जाईल. सदर निधी पंचायत राज संस्थाना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांमध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे.

४. सर्व जिल्हा परिषदांनी e-Gramswaraj-PFMS-Treasury Net यांच्या इंटीग्रेशनने कोषागारात देयक सादर करुन पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या बँक खात्यात १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा निधी जमा करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा परिषदेचा निधी ग्रामविकास विभागामार्फत e-Gramswaraj-PFMS Treasury Net यांच्या इंटीग्रेशनने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे देयक सादर करुन जिल्हा परिषदेच्या बँक खात्यात निधी जमा करणे आवश्यक आहे.

५. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील. सदर शासन निर्णयातील संदर्भ क्र. १, २ व ३ मधील कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

६. **बंधित निधी (Tied Grant)** चा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे.

१. स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरूस्ती
२. पेयजल पाणीपुरवठा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वॉटर रिसायकलींग.

बंधित निधी (टाईडग्रँट) च्या ५०% निधी हा वरील नमूद दोन बाबींसाठी करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पुर्णत: अंमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी पहिल्या बाबीसाठी खर्च करण्यात यावा.

७. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करू नये व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करू नये. तसेच केंद्रिय वित्त आयोग आणि पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि.१४.७.२०२१ आणि दि. ११.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार सदर निधीतून दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत किमान ५० टक्के खर्च होणे आवश्यक आहे. ५०% खर्च झाल्याशिवाय केंद्रीय वित्त आयोगाकडून पुढील हप्त्याचे वितरण केले जाणार नाही. खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर राहील. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरांवर दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत किमान ५०% खर्च करणे आवश्यक आहे.

८. या शासन निर्णयान्वये सन २०२२-२३ च्या बंधित निधीचे वितरण १२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समिती आणि ग्रामपंचायती (पहिला हप्ता ५० ग्रामपंचायती आणि दुसरा हप्ता ३२४ ग्रामपंचायती) यांना करण्यात येणार आहे. सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिवशीच

जिल्हानिहाय निधी बीम्सप्रणालीवर वितरीत करण्यात येणार आहे. हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन कोषागारात देयके सादर करुन तीनच कार्यालयीन दिवसात हा निधी पंचायत समिती आणि ग्रामपंचायती यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. जिल्हा परिषदांचा निधी ग्रामविकास विभागाकडुन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. निधी वितरणास विलंब झाल्यास दंडणीय व्याजाची संपुर्ण जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील.

९. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरासाठी १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या बंधित निधीच्या (Tied Grants) रोखून ठेवलेल्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यापोटी राज्यास प्राप्त निधीच्या वितरणासाठी होणारा खर्च खालील ३ लेखाशिर्षांखाली करण्यात आलेल्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

१. मागणी क्रमांक-एल-३, २५१५ - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९६ - जिल्हा परिषदांना/जिल्हा स्तरीय पंचायतींना सहाय्य (००), (००) (११) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदांना/जिल्हास्तरीय पंचायतींना विविध विकास योजनांसाठी सहाय्य अनुदाने, (बंधित/Tied) (२५१५२६३७), ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. १०३.६२०७ कोटी) (रुपये एकशे तीन कोटी बासष्ट लक्ष सात हजार फक्त)

२. मागणी क्रमांक-एल-३, २५१५ - इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९७- पंचायत समितीना सहाय्य, (००), (००) (०४) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत समितीना सहाय्य अनुदाने, (बंधित/Tied) (२५१५२६५५), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. १०३.६२०७ कोटी) (रुपये एकशे तीन कोटी बासष्ट लक्ष सात हजार फक्त)

३. मागणी क्रमांक-एल-३, २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, (००), १९८- ग्रामपंचायतींना सहाय्य (००),(००) (१२) १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना सहाय्य अनुदाने, (बंधित/Tied)) (२५१५२६७३), ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (रू. १७.४१ कोटी) (रुपये सतरा कोटी एकेचाळीस लक्ष)

१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) वर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. **२०२६०३२३१२१५५४७५२०** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANOJKUMAR SHRENIK SHETE

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.03.23 13:15:19 +05'30'

**(डॉ. मनोजकुमार शेटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत - प्रपत्र - अ**

प्रत.

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे सचिव
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
७. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधान परिषद
८. मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१०.मा.प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
११.महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
१४.सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
१५.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. सर्व उपसचिव / अवर सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१९. जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२०.सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
२१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२.वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प१७- / वित्त आयोग कक्ष.)
२३.ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने )
२४.निवड नस्ती का.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मुंबई १.

प्रपत्र- अ

बंधित निधी

सन २०२२-२३

वितरण आदेश क्र. ९ क्रमांक. पविआ-२०२५/प्र.क्र.९२/वित्त-४ दि.२३ मार्च, २०२६ चे विवरणपत्र

(रक्कम रूपयांत)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद लेखाशिर्ष २५१५२६३७ | | | पंचायत समितीचे नाव | पंचायत समिती लेखाशिर्ष २५१५२६५५ | | | ग्रामपंचायत लेखाशिर्ष २५१५२६७३ | | | | | एकूण रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ला हप्ता | २ रा हप्ता | एकूण रू.(अ) | | १ ला हप्ता | २ रा हप्ता | एकूण रू. (ब) | एकूण ग्रा.पं. पहिला हप्ता | १ ला हप्ता रू. (क) | एकूण ग्रा.पं. दुसरा हप्ता | २ रा हप्ता रू. (ड) | एकूण रू. (इ) = (क+ड) | (अ) +(ब) +(इ) |
| १ | रायगड | ३८२०७५७८ | ३८८२८९१७ | | अलिबाग | ४४००८७३ | ४४७१६२४ | | | | | | | |
| २ | | | | | पेण | ३२८३५२० | ३३३६६०९ | | | | | | | |
| ३ | | | | | पनवेल | ४८७६६८४ | ४९५४८९३ | | | | | | | |
| ४ | | | | | उरण | २५९५६२८ | २६३७०३४ | | | | | | | |
| ५ | | | | | कर्जत | ३७९७७६३ | ३८५९५९२ | | | | | | | |
| ६ | | | | | खालापूर | २७३३६६८ | २७७७८९१ | | | | | | | |
| ७ | | | | | सुधागड पाली | ११६८४८७ | ११८७९७० | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | | | रोहा | ३३९९४१८ | ३४५४८१० | | | | | | |
| ९ | | | | | मुरुड | १३१८२३८ | १३३९८०३ | | | | | | |
| १० | | | | | तळा | ७५९५७९ | ७७२२४८ | | | | | | |
| ११ | | | | | माणगांव | ३०२९०१५ | ३०७८६५१ | | | | | | |
| १२ | | | | | महाड | ३३५८३२७ | ३४१३८३१ | | | | | | |
| १३ | | | | | म्हसळा | १११५७४४ | ११३४०८४ | | | | | | |
| १४ | | | | | श्रीवर्धन | १४३३४४७ | १४५६८०१ | | | | | | |
| १५ | | | | | पोलादपूर | ९३७१८७ | ९५३०७६ | | | | | | |
| | **एकूण** | **३८२०७५७८** | **३८८२८९१७** | **७७०३६४९५** | **एकूण** | **३८२०७५७८** | **३८८२८९१७** | **७७०३६४९५** | | | | | **१५४०७२९९०** |
| १६ | रत्नागिरी | ३०६७२५२५ | ३११७९०५७ | | मंडणगड | १३२२३१८ | १३४४३८३ | | | | | | |
| १७ | | | | | दापोली | ३५५५१५९ | ३६१३८१३ | | | | | | |
| १८ | | | | | खेड | ३५९०५०४ | ३६४९७०२ | | | | | | |
| १९ | | | | | चिपळूण | ४८६११३७ | ४९४११४१ | | | | | | |
| २० | | | | | गुहागर | २५४१६८१ | २५८३६५९ | | | | | | |
| २१ | | | | | संगमेश्वर | ४०३६२६९ | ४१०२७२५ | | | | | | |
| २२ | | | | | रत्नागिरी | ५१३५८६५ | ५२१९५४३ | | | | | | |
| २३ | | | | | लांजा | २०४८२७३ | २०८२७०७ | | | | | | |
| २४ | | | | | राजापूर | ३५८१३१९ | ३६४१३८४ | | | | | | |
| | **एकूण** | **३०६७२५२५** | **३११७९०५७** | **६१८५१५८२** | **एकूण** | **३०६७२५२५** | **३११७९०५७** | **६१८५१५८२** | | | | | **१२३७०३१६४** |
| २५ | सिंधुदुर्ग | १६७२६३५७ | १७००५८६६ | | दोडामार्ग | ११२५५९९ | ११४४८५२ | | ४ | ४६०००० | ४ | ५८८००० | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | | | | | सावंतवाडी | २७९७७२८ | २८४४४३४ | | | | | | | |
| २७ | | | | | वेंगुर्ला | १५५५७६९ | १५८११४६ | | | | | | | |
| २८ | | | | | कुडाळ | ३०५०६८२ | ३१०१२४७ | | | | | | | |
| २९ | | | | | मालवण | २०९१७५१ | २१२६५८३ | | | | | | | |
| ३० | | | | | कणकवली | २६८९४२८ | २७३४४१२ | | | | | | | |
| ३१ | | | | | देवगड | २३९६५६७ | २४३६६८३ | | | | | | | |
| ३२ | | | | | वैभववाडी | १०१८८३३ | १०३६५०९ | | | | | | | |
| | **एकूण** | **१६७२६३५७** | **१७००५८६६** | **३३७३२२२३** | **एकूण** | **१६७२६३५७** | **१७००५८६६** | **३३७३२२२३** | **४** | **४६००००** | **४** | **५८८०००** | **१०४८०००** | **६८५१२४४६** |
| ३३ | पुणे | ७२२६८२८८ | ७३४५१७८१ | | आंबेगाव | ४६२८१४६ | ४७०३९८६ | | ३ | १२१५००० | ८७ | ४२५०६००० | | |
| ३४ | | | | | बारामती | ६४०८८७४ | ६५१३८८८ | | | | | | | |
| ३५ | | | | | भोर | ३६५२१३५ | ३७१२३०९ | | | | | | | |
| ३६ | | | | | दौंड | ६९७४०८४ | ७०८८०५६ | | | | | | | |
| ३७ | | | | | हवेली | ५३८५६२८ | ५४७२५९३ | | | | | | | |
| ३८ | | | | | इंदापूर | ७७७५०५२ | ७९०२०८३ | | | | | | | |
| ३९ | | | | | जुन्नर | ७९९२२६८ | ८१२२७९० | | | | | | | |
| ४० | | | | | खेड | ७६२२१२१ | ७७४६४४८ | | | | | | | |
| ४१ | | | | | मावळ | ५४२७३७९ | ५५१६००५ | | | | | | | |
| ४२ | | | | | मुळशी | ३३१६५१७ | ३३७१५७१ | | | | | | | |
| ४३ | | | | | पुरंदर | ४२११९२९ | ४२८१६१७ | | | | | | | |
| ४४ | | | | | शिरुर | ७५८२८५५ | ७७०७१९८ | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४५ | | | | | वेल्हा | १२९१३०० | १३१३२३७ | | | | | | | |
| | **एकूण** | **७२२६८२८८** | **७३४५१७८१** | **१४५७२००६९** | **एकूण** | **७२२६८२८८** | **७३४५१७८१** | **१४५७२००६९** | **३** | **१२१५०००** | **८७** | **४२५०६०००** | **४३७२१०००** | **३३५१६११३८** |
| ४६ | सातारा | ५२६५३०९७ | ५३५१५०२० | | जावळी (मेढा) | २२३२९६५ | २२६९८७८ | | | | | | | |
| ४७ | | | | | वाई | ३५४४४१२ | ३६०२४६७ | | | | | | | |
| ४८ | | | | | सातारा | ६५६०८०० | ६६६६९०२ | | | | | | | |
| ४९ | | | | | फलटण | ६२८०६६१ | ६३८३१८५ | | | | | | | |
| ५० | | | | | महाबळेश्वर | १०८३८०५ | ११०२४१३ | | | | | | | |
| ५१ | | | | | माण | ४२६२८९५ | ४३३४४१३ | | | | | | | |
| ५२ | | | | | कोरेगांव | ४६६८६२३ | ४७४५०६२ | | | | | | | |
| ५३ | | | | | खटाव | ५६५११३१ | ५७४४३४९ | | | | | | | |
| ५४ | | | | | खंडाळा | २४१९१४५ | २४५८७४७ | | | | | | | |
| ५५ | | | | | कराड | ९८०००३९ | ९९५७७४९ | | | | | | | |
| ५६ | | | | | पाटण | ६१४८६२१ | ६२४९८५५ | | | | | | | |
| | **एकूण** | **५२६५३०९७** | **५३५१५०२०** | **१०६१६८११७** | **एकूण** | **५२६५३०९७** | **५३५१५०२०** | **१०६१६८११७** | | | | | | **२१२३३६२३४** |
| ५७ | सांगली | ४२५३६६०३ | ४३२३२२५८ | | आटपाडी | २६०७३९७ | २६५०९१२ | | | | ५ | २३७०००० | | |
| ५८ | | | | | जत | ६७०२५३९ | ६८१४८५१ | | | | | | | |
| ५९ | | | | | कडेगाव | २८०८४४७ | २८५४४३४ | | | | | | | |
| ६० | | | | | कवठे-महांकाळ | ३०४३७१५ | ३०९४४७७ | | | | | | | |
| ६१ | | | | | विटा | २५६३५९१ | २६०६११५ | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६२ | | | | | मिरज | ७२४२१२७ | ७३५८९६२ | | | | | | |
| ६३ | | | | | पलूस | २८१७३९५ | २८६२६१९ | | | | | | |
| ६४ | | | | | शिराळा | ३०९०००० | ३१४०११६ | | | | | | |
| ६५ | | | | | तासगांव | ४५१६५४८ | ४५९०१९१ | | | | | | |
| ६६ | | | | | वाळवा | ७१४४८४४ | ७२५९५८१ | | | | | | |
| | **एकूण** | **४२५३६६०३** | **४३२३२२५८** | **८५७६८८६१** | **एकूण** | **४२५३६६०३** | **४३२३२२५८** | **८५७६८८६१** | | | **५** | **२३७००००** | **२३७००००** | **१७३९०७७२२** |
| ६७ | सोलापूर | ६१२१४८३५ | ६२२२४८५० | | अक्कलकोट | ५४०८७२३ | ५४९७९६९ | | २ | १११३००० | ६५ | ४०७८२००० | | |
| ६८ | | | | | बार्शी | ५१६९७८५ | ५२५५७४२ | | | | | | | |
| ६९ | | | | | करमाळा | ५२४५५३६ | ५३३३२९० | | | | | | | |
| ७० | | | | | माढा | ६३३२४९८ | ६४३६८६३ | | | | | | | |
| ७१ | | | | | माळशिरस | ८०८७६११ | ८२१९८०३ | | | | | | | |
| ७२ | | | | | मोहोळ | ५१४६५५० | ५२३१०७९ | | | | | | | |
| ७३ | | | | | मंगळवेढा | ४२२२२०८ | ४२९३०१८ | | | | | | | |
| ७४ | | | | | उत्तर सोलापूर | २७६०७९६ | २८०८९५३ | | | | | | | |
| ७५ | | | | | पंढरपूर | ७०१४८९१ | ७१२७७५२ | | | | | | | |
| ७६ | | | | | सांगोला | ६१९६२०४ | ६२९७७८१ | | | | | | | |
| ७७ | | | | | दक्षिण सोलापूर | ५६३००३३ | ५७२२६०० | | | | | | | |
| | **एकूण** | **६१२१४८३५** | **६२२२४८५०** | **१२३४३९६८५** | **एकूण** | **६१२१४८३५** | **६२२२४८५०** | **१२३४३९६८५** | **२** | **१११३०००** | **६५** | **४०७८२०००** | **४१८९५०००** | **२८८७७४३७०** |
| ७८ | कोल्हापूर | ५७०१८६२१ | ५७९४०४६४ | | करवीर | ९७६८२९२ | ९९२४१५१ | | ४ | ४६५००० | ४ | ५९६००० | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७९ | | | | | गडहिंग्लज | ३९६३३५० | ४०२७२६२ | | | | | | | |
| ८० | | | | | राधानगरी | ४२३२९०३ | ४३०१९६४ | | | | | | | |
| ८१ | | | | | चंदगड | ३८७९७०८ | ३९४३७७४ | | | | | | | |
| ८२ | | | | | पन्हाळा | ५२४४३७० | ५३२८८०५ | | | | | | | |
| ८३ | | | | | आजरा | २२५१११८ | २२८८२६० | | | | | | | |
| ८४ | | | | | भुदरगड | ३२३४४१५ | ३२८७४६९ | | | | | | | |
| ८५ | | | | | गगनबावडा | ८५३५१७ | ८६८०१५ | | | | | | | |
| ८६ | | | | | शाहूवाडी | ३९९५०६८ | ४०६१२८९ | | | | | | | |
| ८७ | | | | | शिरोळ | ५८७८६५६ | ५९७२७३१ | | | | | | | |
| ८८ | | | | | कागल | ४७१४१२८ | ४७९००६६ | | | | | | | |
| ८९ | | | | | हातकणंगले | ९००३०९६ | ९१४६६७८ | | | | | | | |
| | **एकूण** | **५७०१८६२१** | **५७९४०४६४** | **११४९५९०८५** | **एकूण** | **५७०१८६२१** | **५७९४०४६४** | **११४९५९०८५** | **४** | **४६५०००** | **४** | **५९६०००** | **१०६१०००** | **२३०९७९१७०** |
| ९० | छत्रपती संभाजीनगर | ४७६२१९०० | ४८४०२९३९ | | छत्रपती संभाजीनगर | ७१५०४१९ | ७२६५९९३ | | | | २ | ५०८००० | | |
| ९१ | | | | | पैठण | ६६०७१७४ | ६७१५४३८ | | | | | | | |
| ९२ | | | | | गंगापूर | ६९६३४०१ | ७०७६७९३ | | | | | | | |
| ९३ | | | | | वैजापूर | ६०२५७६३ | ६१२५७१२ | | | | | | | |
| ९४ | | | | | कन्नड | ६६५७८५९ | ६७६८२४९ | | | | | | | |
| ९५ | | | | | खुल्ताबाद | २२०८४११ | २२४४७२१ | | | | | | | |
| ९६ | | | | | सिल्लोड | ६४१६९१२ | ६५२१७३६ | | | | | | | |
| ९७ | | | | | फुलंब्री | ३२२५२३१ | ३२७८१९८ | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९८ | | | | | सोयगांव | २३६६७३० | २४०६०९९ | | | | | | | |
| | **एकूण** | **४७६२१९००** | **४८४०२९३९** | **९६०२४८३९** | **एकूण** | **४७६२१९००** | **४८४०२९३९** | **९६०२४८३९** | | | २ | ५०८००० | ५०८००० | १९२५५७६७८ |
| ९९ | परभणी | २७१५९३६८ | २७६०६२३९ | | सेलू | २६९४४६४ | २७३९०१९ | | | | | | | |
| १०० | | | | | जिंतूर | ५२०१२९३ | ५२८७१८७ | | | | | | | |
| १०१ | | | | | परभणी | ४९९१०५३ | ५०७३०९९ | | | | | | | |
| १०२ | | | | | मानवत | १८६५२६२ | १८९६०५३ | | | | | | | |
| १०३ | | | | | पाथरी | २२३०३५१ | २२६७१२६ | | | | | | | |
| १०४ | | | | | सोनपेठ | १६०५४२८ | १६३१८६७ | | | | | | | |
| १०५ | | | | | गंगाखेड | ३२७९१९२ | ३३३२८४५ | | | | | | | |
| १०६ | | | | | पालम | २१६७८७५ | २२०३४६५ | | | | | | | |
| १०७ | | | | | पूर्णा | ३१२४४५० | ३१७५५७८ | | | | | | | |
| | **एकूण** | **२७१५९३६८** | **२७६०६२३९** | **५४७६५६०७** | **एकूण** | **२७१५९३६८** | **२७६०६२३९** | **५४७६५६०७** | | | | | | १०९५३१२१४ |
| १०८ | धाराशिव | २९९३८६८२ | ३०४३३४७५ | | धाराशिव | ६४१३५९८ | ६५१८६७९ | | | | | | | |
| १०९ | | | | | तुळजापूर | ५०६९४३२ | ५१५४०१३ | | | | | | | |
| ११० | | | | | उमरगा | ४७९२४५२ | ४८७१९७२ | | | | | | | |
| १११ | | | | | लोहारा | २५२१०३९ | २५६२४२९ | | | | | | | |
| ११२ | | | | | कळंब | ४१५३५३० | ४२२१८०४ | | | | | | | |
| ११३ | | | | | वाशी | १५४४५६० | १५६९४८६ | | | | | | | |
| ११४ | | | | | भूम | २६७१७७८ | २७१६३७१ | | | | | | | |
| ११५ | | | | | परंडा | २७७२२९३ | २८१८७२१ | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **एकूण** | **२९९३८६८२** | **३०४३३४७५** | **६०३७२१५७** | **एकूण** | **२९९३८६८२** | **३०४३३४७५** | **६०३७२१५७** | | | | | | **१२०७४४३१४** |
| ११६ | लातूर | ३७८७५१४६ | ३८४९३१३४ | | अहमदपूर | ४०७८३६२ | ४१४४८९३ | | | | ५ | ११४७००० | | |
| ११७ | | | | | औसा | ५८७९२८४ | ५९७५५०८ | | | | | | | |
| ११८ | | | | | चाकूर | ३३७३६५८ | ३४२८८२६ | | | | | | | |
| ११९ | | | | | देवणी | १८२६१२६ | १८५६१०६ | | | | | | | |
| १२० | | | | | जळकोट | १६८०७३३ | १७०८२५१ | | | | | | | |
| १२१ | | | | | लातूर | ६३४८५५२ | ६४५१७६४ | | | | | | | |
| १२२ | | | | | निलंगा | ६०६४४१२ | ६१६२९२५ | | | | | | | |
| १२३ | | | | | रेणापूर | २६५५१७० | २६९८६२१ | | | | | | | |
| १२४ | | | | | शिरूर अनंतपाळ | १५७३१५० | १५९८८३९ | | | | | | | |
| १२५ | | | | | उदगीर | ४३९५६९९ | ४४६७४०१ | | | | | | | |
| | **एकूण** | **३७८७५१४६** | **३८४९३१३४** | **७६३६८२८०** | **एकूण** | **३७८७५१४६** | **३८४९३१३४** | **७६३६८२८०** | | | **५** | **११४७०००** | **११४७०००** | **१५३८८३५६०** |
| | ठाणे | | | | | | | | ३ | ५९३००० | ३० | १७८३७००० | **१८४३००००** | **१८४३००००** |
| | पालघर | | | | | | | | | | २३ | २०९९२००० | **२०९९२०००** | **२०९९२०००** |
| | अल्यिानगर | | | | | | | | ४ | २३३०००० | ४ | २९८६००० | **५३१६०००** | **५३१६०००** |
| | बीड | | | | | | | | ६ | २१८०००० | ८ | ३४०८००० | **५५८८०००** | **५५८८०००** |
| | नांदेड | | | | | | | | १० | १६८६००० | १३ | २८९०००० | **४५७६०००** | **४५७६०००** |
| | अमरावती | | | | | | | | १ | १९२००० | १ | २४६००० | **४३८०००** | **४३८०००** |
| | वाशिम | | | | | | | | १ | ५३५००० | | | **५३५०००** | **५३५०००** |
| | यवतमाळ | | | | | | | | ७ | ९५१००० | ७ | १२२०००० | **२१७१०००** | **२१७१०००** |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भंडारा | | | | | | | | | | ५९ | २१४८९००० | २१४८९००० | २१४८९००० |
| | वर्धा | | | | | | | | १ | २०९००० | १ | २६८००० | ४७७००० | ४७७००० |
| | गडचिरोली | | | | | | | | ४ | ६७१००० | ६ | १६६७००० | २३३८००० | २३३८००० |
| | | | | | | | एकूण | | | | | | | २२४६५१४००० |

MANOJKUMAR SHRENIK SHETE

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.03.23 13:16:14 +05'30'

(डॉ. मनोजकुमार शेटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन